**<u>शपथेवर पुढील सरतपास  अर्जदारातर्फे वकील श्री. बी. आर. मुलाणी यांचेकडून</u>**

**१०.** मी यादी नि.क्र. यु–२ अ.क्र. १ वर एफ.आय.आर. ची प्रत, अ.क्र. २ वर गुन्हाचा तपशील नुमना/घटनास्थळ पंचनामा, अ.क्र. ३ वर मरणोत्तर पंचनामा, अ.क्र. ४ वर पी.एम.रिपोर्ट, अ.क्र. ५ वर मृत्यू प्रमाणपत्र, अ.क्र. ६ वर माझा मुलगा सुशांत याचे आधार कार्ड, अ.क्र. ७ वर वाहन चालविण्याचा परवाना, अ.क्र. ८ वर रेशन कार्डची छायांकीत प्रत, अ.क्र. ९ वर माझ्या आधार कार्डची प्रत व अ.क्र. १३ वर विमा पॉलीसी अशी कागदपत्रं दाखल केली आहेत. त्यास **नि.क्र. यु–८ ते यु–१७** देण्यात येते.

**११.** तसेच मी यादी नि.क्र. यु–७ सोबत अ.क्र. १ वर माझा मयत मुलगा सुशांत याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकीत प्रत व अ.क्र. २ वर मयत सुशांत याचा घटस्फोट झालेल्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. त्यास नि.क्र. **यु–१८ व यु–१९** देण्यात येते.

**<u>उलटतपास  वि.प. क्रमांक १ तर्फे विधिज्ञ श्री. एस.डी. साळोखे यांच्याकडून</u>**

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, मयत सुशांत हा वि.प. क्रमांक १ यांच्याकडे अपघातापूर्वी पाच महिन्यापासून कामास होता. हे म्हणणे खरे आहे की, वि.प. क्रमांक १ हे मयत सुशांत यास नियमित पगार देत होते. हे मला माहित नाही की, वि.प. क्रमांक १ हे मयत सुशांत यास पगाराची उचल रक्कम देत होते. हे म्हणणे खरे नाही की, वि.प. क्रमांक १ हे मयत सुशांत यास दरमहा रुपये १३,०००/– पगार देत होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २९/०४/२०२४ रोजी झालेल्या

**निशाणी युडब्ल्यू -१**

अपघातावेळी सदर वाहनातून वि.प. क्र. १ व त्यांचे कुटूंबीय प्रवास करत होते. हे म्हणणे खरे आहे की, वि.प. क्र. १ व त्यांच्या कुटूंबातील व्यक्तीना या अपघातात गंभीर जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झालेनंतर सुशांत यास दवाखान्यात नेईपर्यंत व तो मयत झालेनंतर त्याचे शव घरी पोहचवेपर्यंतचा सर्व खर्च वि.प. क्रं. १ यांनी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मागण्याकरिता आम्ही कधीही वि.प. क्र. १ यांना भेटलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, वि.प. क्र. १ हे नुकसान भरपाईची रक्कम आम्हाला देणे लागत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मयत सुशांत याच्या पगाराबाबत मी खोटी माहिती दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन वि.प. क्र. १ यांच्याविरुध्द चुकीची मागणी केलेली आहे.

**उलटतपास वि.प. क्रमांक २ करिता – प्रकरण एकतर्फा चालले.**

**उलटतपासणी पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**

कोल्हापूर. (मधुरा आ.मुळीक)
आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई आणि
दि. १३/०२/२०२६ न्यायाधीश, कामगार न्यायालय, क्र.१,कोल्हापूर.